| MHBI110033712025 | **दिवाणी किरकोळ अर्ज नं. ८३९/२०२५**<br>**संदिप किशोरलाल भंडारी वि. रविंद्र किशोरलाल भंडारी वगैरे**<br>**मधील नि.क्र.०१ खालील आदेश** |
|---|---|

१] अर्जदाराने प्रस्तुतचा अर्ज वारसा दाखला मिळणेसाठी केलेला आहे. अर्जदार यांचे थोडक्यात कथन असे आहे की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ व २ यांची आई **सुमनबाई भ्र. किशोरलालजी भंडारी** ही दि.१६/१२/१९९६ रोजी अहिल्यानगर, जि. अहिल्यानगर येथे मयत झाली आहे. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ व २ यांना शासकिय व निमशासकिय रेकॉर्डला मयताचे वारस म्हणुन वारसा आधारे नाव लावण्यासाठी वारसा प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. त्यामुळे अर्जदाराने **सुमनबाई भ्र. किशोरलालजी भंडारी** यांचे अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ व २ हे एकमेव कायदेशीर वारस असलेबाबत वारसा दाखला मिळणेकरीता अर्ज दाखल आहे.

२] सदरकामी दि.१८/१०/२०२५ चे 'दै. बीड किसान' मध्ये जाहिरनामा प्रसिद्ध करुन सुद्धा सदर अर्जास कुणीही हरकत घेतलेली नाही. गैरअर्जदार क्र.१ व २ यांना नोटीसची बजावणी होवूनही ते न्यायालयात हजर न झाल्याने दि.१२.०३.२०२६ रोजीचे नि.१ वरील आदेशान्वये प्रस्तुत अर्ज त्यांच्या विरुध्द एकतर्फा चालविण्यात आला. अर्जदाराने नि.१७ येथे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले असून सदर शपथपत्राला गैरअर्जदार यांनी कोणतेही आव्हान केलेले नाही.

३] अर्जाच्या अनुषंगाने खालील मुद्दे माझे विवेचनास उपस्थित होतात व मी त्यावरील निष्कर्ष त्या खाली नमूद कारणमिमांसावरुन नोंदवत आहे.

| अ.नं. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | अर्जदार हे सिध्द करतो काय की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ व २ हे मयत **सुमनबाई भ्र. किशोरलालजी भंडारी** यांचे कायदेशीर वारस आहेत ? | **होय** |

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.16 17:03:31 +0530

| | | |
|---|---|---|
| २ | अर्जदार हे सिध्द करतो काय की, मयत **सुमनबाई भ्र. किशोरलालजी भंडारी** ही दि. १६/१२/१९९६ रोजी विना–मृत्युपत्र मयत झाली आहे ? | **होय** |
| ३ | काय आदेश ? | **अर्ज मंजुर करण्यात येतो.** |

## कारणमिमांसा

**मुद्दा नं.१ ते ३ करीता–**

४]	अर्जदाराने त्यांचे मागणीचे पृष्ठयर्थ नि.क्र.१७ ला पुराव्याचे शपथ पत्र दाखल केले आहे. त्यांनी त्यांचे शपथपत्रात अर्जातील कथनांचा पुर्नउच्चार केला आहे. अर्जदार यांनी नि.६ वर सुमनबाई किशोरलालजी भंडारी व नि.७ वर किशोरलाल ताराचंद भंडारी यांचे मृत्यूप्रमाणपत्र दाखल केलेले आहे. तसेच नि.४ सोबत मौजे चकलांबा येथील गट क्र.८४९ चा ७/१२ उतारा दाखल केलेला आहे. नि.१६ येथील जाहीरनामा प्रकाशित झाल्यानंतर देखील कोणीही जाहीरनाम्याला हरकत नोंदवलेली नाही. तसेच गैरअर्जदार क्र.१ व २ यांनी देखील प्रकरणात हजर होवून अर्जास हरकत घेतली नाही. त्यामुळे अर्जदाराचा पुरावा विनाआव्हानीत राहिलेला आहे.

५]	प्रकरणातील दाखल कागदपत्रे, सत्यप्रतिज्ञापत्राचे अवलोकन करता असे निर्देशनास येते की, अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ व २ मुले या नात्याने मयत **सुमनबाई भ्र. किशोरलालजी भंडारी** यांचे कायदेशीर वारस आहेत. सबब मी मुद्दा क्र. १ व २ चे निष्कर्ष होकारार्थी देवुन मुद्दा क्र. ३ चे निष्कर्ष दाखल खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे :

## आदेश

१. अर्ज मंजूर करणेत येत आहे.

२. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ व २ हेच मयत **सुमनबाई भ्र. किशोरलालजी भंडारी** यांचे कायदेशीर वारस आहेत, असे जाहीर करण्यात येते.

SHRUTI HANUMANTRAO PATIL
Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.16 17:03:35 +0530

३. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ व २ हेच मयत **सुमनबाई भ्र. किशोरलालजी भंडारी** यांचे वारस असलेने विहीत कारणासाठी वारस दाखला त्यांना विहीत न्यायशुल्क भरल्यानंतर प्रदान करणेत यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात पारीत व घोषीत.)

SHRUTI HANUMANTRAO PATIL

Digitally signed by SHRUTI HANUMANTRAO PATIL
Date: 2026.04.16 17:03:39 +0530

**गेवराई.** **(श्रुती ह. पाटील)**

**दि. १६/०४/२०२६** **सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,**

**गेवराई.**

## CERTIFICATE

I affirm that the contents of this P. D. F. file are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | | |
|---|---|---|
| Dictated on | :- | 16.04.2026 |
| Transcribed on | :- | 16.04.2026 |
| Checked & Signed on | :- | 16.04.2026 |

Sd/-
(P.B. Kusumkar)
Stenographer, Georai.